दूरध्वनी : २५३३ १२११
२५३३ १५९०

# ठाणे महानगरपालिका , ठाणे.

महापालिका भवन , सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग , चंदनवाडी , पांचपाखाडी, ठाणे - ४००६०२
THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

## ठाणे महापालिकेच्यावतीने आपत्ती धोके निवारण सप्ताहाचे आयोजन

ठाणे(०६): ठाणे महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्यावतीने मंगळवार दिनांक ९ ऑक्टोंबर २०१८ ते १३ ऑक्टोंबर २०१८ या कालावधीत "आपत्ती धोके निवारण सप्ताहाचे" आयोजन करण्यात आले आहे.

संयुक्त राष्ट्र संघाने घोषित केल्यानुसार राज्य व जिल्हास्तरावर दिनांक १३ ऑक्टोंबर हा आपत्ती धोके निवारण दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.या दिवसाचे औचित्य साधून दिनांक ९ ऑक्टोंबर २०१८ ते १३ ऑक्टोंबर २०१८ या कालावधीत आपत्ती धोके निवारण सप्ताह साजरा करण्यात येणार आहे.

या निमित्ताने महापालिका क्षेत्रातील सर्व शाळांमध्ये निबंध स्पर्धा,चित्रकला स्पर्धा,पथनाट्य इद्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आपत्तीजन्य परिस्थितीत कोणत्या गोष्टी कराव्यात, कोणत्या करू नये या बाबत मोबाईल व्हॅन, पथनाट्य,प्रदर्शन व पोस्टर्स आदीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे.